**<u>नि. सी–6 वरील दि. 30/07/2025 च्या आदेशानुसार उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

**<u>उलटतपास : जाब देणारतर्फे श्री. व्ही. एन. उपाध्ये वकील यांच्यामार्फत :</u>**

3. माझी जन्मतारिख 03/04/1975 आहे. ज्या वेळेस मी बॅंकेत कामावर लागलो त्यावेळेस माझा पगार रू. 2200/– होता. जेव्हा मला कामावरून कमी केले तेव्हा माझा पगार रू. 14,000/– होता, सगळे मिळून एकूण रू. 16,000/– पगार होता. सुरूवातीला मी क्लार्क म्हणून लागलो नंतर मी कॅशियर झालो. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा मला कामावरून कमी केले तेव्हा मी ब्रॅंच मॅनेजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, क्लार्क व ब्रॅंच मॅनेजर यांच्या कामात फरक आहे. ब्रॅंच मॅनेजरच्या डयुटीजमध्ये ग्राहकाच्या अकाउंटमध्ये बॅलन्स आहे काय, खातेदाराच्या सहींची शहानिशा करणे वगेरे काम असते. ज्यावेळेस मी बॅंकेचा ब्रॅंच मॅनेजर म्हणून चार्ज घेतला त्यावेळेस शाखेची आर्थिक परिस्थिती चांगली होती व मी त्यात वाढ केली होती. आमच्या शाखेमध्ये कामावर 4 जण होते. कॅशियर, क्लार्क, शिपाई, तपासनिस, मॅनेजर असे लोक बॅंकेच्या शाखेत कामाला होते. या सर्वांच्या कामावर मी नियंत्रण ठेवत होतो. जेव्हा क्लार्क गैरहजर असायचा तेव्हा त्याचे काम अकाउंटंट बघायचे. हे म्हणणे खरे आहे की, कॅशियर गैरहजर राहिल्यावर त्याचे कामकाज मी पहायचो. मॅनेजर म्हणून माझे कार्यकाळात शाखेची आर्थिक परिस्थितीमध्ये वाढ झाली असा अहवाल मी हेड ऑफीसला पाठवला होता. बॅंकेमध्ये स्टेशनरी असते त्याचे नियोजन क्लार्क करतात. स्टेशनरीची मागणी करायची असेल तर ब्रॅंच मॅनेजर म्हणून मी डिमांड पाठवायचो.

**<u>जाब देणार यांच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

स्वाक्षरीत/–
**(श्रीमती आर. एन. मर्क)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 2 औरंगाबाद

दिनांक–28/07/2026